


दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २९४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०५ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## केरळात मान्सूनचे आगमन; महाराष्ट्रात ऑरेंज अलर्ट जारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०४, नागपूर :** मान्सूनचे अखेर केरळमध्ये आगमन झाले आहे. यंदा तो नेहमीपेक्षा सुमारे तीन दिवस उशिराने दाखल झाला आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, सध्या मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल बनत असून येत्या काही दिवसांत दक्षिण महाराष्ट्रातही मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. मात्र विदर्भातील नागरिक आणि शेतकऱ्यांना अजून काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे. विदर्भात १५ जूननंतरच मान्सूनच्या आगमनाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.



हवामान विभागाचे वैज्ञानिक प्रवीण कुमार यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. विदर्भात साधारणपणे १० ते १५ जून दरम्यान मान्सूनचे आगमन होत असते. यापूर्वीच्या वर्षांमध्येही याच कालावधीत मान्सून दाखल झाल्याचे दिसून आले आहे. काही वेळा तो लवकर तर काही वेळा उशिरानेही पोहोचतो. सध्या मात्र विदर्भासाठी मान्सूनच्या आगमनास आवश्यक असलेली अनुकूल परिस्थिती तयार झालेली नसल्याने त्याच्या आगमनाची निश्चित तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही, असं शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी सांगितलं.

**राज्यातील तीन जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट**

दरम्यान, पुढील दोन ते तीन दिवस विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा प्रभाव दिसून येणार आहे. हवामान विभागाने वर्धा, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या भागांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह मेघगर्जना आणि जोरदार वाऱ्यांची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याचाही अंदाज वर्तविण्यात आला आहे, अशी माहिती प्रवीण कुमार यांनी दिली.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, या कालावधीत वाऱ्यांचा वेग ताशी ५० ते ६० किलोमीटरपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**हवामान विभागाकडून शेतकऱ्यांना मोलाचं आवाहन**

विदर्भात सध्या ढगाळ वातावरण निर्माण होत असले तरी तापमानात विशेष घट होण्याची शक्यता नाही. पुढील काही दिवस विदर्भात कमाल तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. मात्र १० जूननंतर तापमानात काही प्रमाणात घट होऊ शकते, असे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. तर सध्या पडणारा पाऊस हा मान्सूनपूर्व स्वरूपाचा असल्याने केवळ या पावसाच्या आधारावर पेरणीची घाई करू नये. पुरेसा आणि सातत्यपूर्ण पाऊस झाल्यानंतरच खरीप हंगामातील पेरणी सुरू करावी, असे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

## ग्रामीण भागातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०४, चारठाणा (परभणी) :** जून महिन्याचे तीन दिवस उलटून गेले असतानाही अद्याप मान्सूनचे आगमन झालेले नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असून खरीप हंगामाच्या तयारीवर त्याचा परिणाम होताना दिसत आहे.

यावर्षीच्या संपूर्ण उन्हाळ्यात एकदाही अवकाळी पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या शेत मशागतीची अनेक कामे रखडली आहेत. शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी आवश्यक तयारी सुरू केली असली, तरी पावसाअभावी नांगरणी, वखरणी तसेच इतर पूर्वमशागतीची कामे पूर्ण होऊ शकलेली नाहीत.

सध्या जून महिना सुरू असूनही पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झालेले दिसत नाही. हवामानातील बदलत्या परिस्थितीमुळे यंदा खरीप पेरणीला उशीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पावसाच्या प्रतीक्षेत असलेले शेतकरी दररोज आकाशाकडे नजर लावून बसले असून मान्सून लवकर दाखल व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत.

दरम्यान, पावसाच्या विलंबामुळे कृषी क्षेत्रात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून आगामी काही दिवसांत मान्सून सक्रिय झाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. सध्या मात्र ग्रामीण भागातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

## महायुतीच्या शक्तिप्रदर्शनाने परभणीत राजकीय वातावरण तापले;
## सईद खान यांच्या विजयाचा विश्वास, उदय सामंत यांचा दावा

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०४, परभणी :** परभणी-हिंगोली विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचे अधिकृत उमेदवार सईद खान यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या भव्य बैठकीने जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महायुतीच्या सर्व घटक पक्षांच्या नेत्यांची, पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभलेल्या या बैठकीत आगामी निवडणुकीसाठी विजयाचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यसभेचे खासदार रामराव वळकुटे, कलमनुरीचे आमदार संतोष बांगर, परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर, माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, परभणी-हिंगोली जिल्हा संपर्कप्रमुख आनंदराव जाधव यांच्यासह महायुतीतील सर्व घटक पक्षांचे जिल्हाध्यक्ष, नगराध्यक्ष, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती, सर्व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.बैठकीत बोलताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सईद खान यांच्या विजयाबाबत ठाम विश्वास व्यक्त केला. महायुतीचे उमेदवार सईद खान यांचा विजय आजच निश्चित झाला आहे.

महायुतीतील सर्व नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकदिलाने काम करत आहेत. त्यामुळे आता निवडणुकीच्या निकालाची वाट न पाहता विजयाच्या जल्लोषाची तयारी करण्याची वेळ आली आहे, असे ते म्हणाले. यावेळी उपस्थित नेत्यांनी महायुतीची एकजूट, विकासाची भूमिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधींचा पाठिंबा यामुळे सईद खान यांचे पारडे जड असल्याचे मत व्यक्त केले. निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजय मिळवण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने शेवटच्या क्षणापर्यंत सक्रिय राहण्याचे आवाहनही करण्यात आले.बैठकीदरम्यान प्रचाराचे नियोजन, मतदारांशी संवाद, बूथस्तरीय बांधणी, संपर्क मोहीम आणि निवडणुकीच्या रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. महायुतीच्या सर्व घटक पक्षांनी



एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

विशेष म्हणजे, या बैठकीला लाभलेली विक्रमी उपस्थिती आणि महायुतीतील सर्व प्रमुख नेत्यांची एकत्रित उपस्थिती यामुळे परभणी-हिंगोली विधान परिषद निवडणुकीत महायुतीने आपली ताकद दाखवून दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. बैठकीनंतर कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सईद खान यांच्या विजयाबाबत आत्मविश्वास अधिक बळकट झाल्याचे दिसून आले. या वेळी हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी मतदार संघातील आमदार संतोष बागर यांनी हिंगोली जिल्ह्यातून भरघोस मतदान देण्याचा विश्वास आमदार बांगर यांनी दिला विशेष म्हणजे महायुतीतील बंड म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विजय जामकर संग्राम जामकर भारतीय जनता पार्टीचे बुधवंत यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे महायुतीचा विजय हा निश्चित होताना आपल्याला दिसत आहे.

## तुकाराम मुंढे यांच्या FDA आयुक्तपदाच्या नियुक्तीचे स्वागत
## बदली होऊ न देण्याचे जनतेला आवाहन



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०४, जुईनगर (नवी मुंबई) :** महाराष्ट्रातील कर्तव्यदक्ष आणि कठोर प्रशासकीय अधिकारी म्हणून ओळख असलेले तुकाराम मुंढे यांची अन्न व औषध प्रशासन (FDA) आयुक्तपदी नियुक्ती होताच त्यांनी कारवाईचा धडाका सुरू केल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे राज्यातील भेसळखोरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आज बाजारात दूध, पनीर, तूप, दही, ताक, श्रीखंड, खाद्यतेल, फळे, भाजीपाला यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंमध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अशा परिस्थितीत तुकाराम मुंढे यांच्यासारखा धाडसी आणि प्रामाणिक अधिकारीच भेसळखोरांविरुद्ध कठोर कारवाई करून जनतेला शुद्ध अन्नपदार्थ मिळवून देऊ शकतो, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

जुईनगर येथील समाजसेवक श्रीधर मढवी यांनी जनतेला आवाहन करताना सांगितले की, तुकाराम मुंढे यांची ॠअ आयुक्तपदावरून कोणत्याही प्रकारे बदली होऊ नये. निदान पुढील तीन वर्षे तरी त्यांना या पदावर कायम ठेवले गेले पाहिजे. त्यांच्या बदलीचा निर्णय कोणत्याही मंत्र्याने घेऊ नये, अशी जनतेची अपेक्षा आहे. जर एखाद्या मंत्री किंवा अधिकाऱ्याने त्यांची बदली करण्याचा प्रयत्न केला, तर जनतेने त्याला तीव्र विरोध केला पाहिजे.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, मुंढे साहेबांची बदली होण्याआधीच नागरिकांनी आवाज उठविण्यास सुरुवात केली पाहिजे. त्यामुळे कोणत्याही मंत्र्याची अशा प्रकारचा निर्णय घेण्याची हिंमत होणार नाही. हा संदेश संपूर्ण महाराष्ट्रभर पोहोचला पाहिजे, कारण जनतेच्या आरोग्याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे.


तुकाराम मुंढे यांच्या कार्यशैलीमुळे राज्यातील भेसळखोरांवर मोठा आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, सर्वसामान्य नागरिकांकडून त्यांच्या कार्याला मोठा पाठिंबा मिळताना दिसत आहे.

## स्थानिक कंत्राटदार संघटनेने बजावली मुख्य अभियंत्यांना कायदेशीर नोटीस

- कंत्राटदारांचा उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा!
- स्थापत्य विभाग-२ च्या १९ निविदा वादाच्या भोवऱ्यात
- मुख्यमंत्री व उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी तक्रार

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०४, नागपूर :** महानिर्मितीच्या अखत्यारीत असलेल्या कोराडी वीज केंद्र स्थापत्य विभाग-२ चे मुख्य अभियंता यांच्या आदेशाने काढण्यात आलेल्या खुल्या निविदा वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. राज्य शासनाचे स्पष्ट आदेश असताना सुद्धा निविदांच्या अटींमध्ये जिओ-टॅगिंगची जाचक अट सक्तीची करण्यात आली.



या मनमानी कारभारा विरोधात खापरखेडा स्थानिक कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनने मुख्य अभियंता व महानिर्मिती कंपनीला कायदेशीर नोटीस बजावली असून ७ दिवसाच्या आत जियो टॅगिंग अट रद्द करून नवीन निविदा प्रसिद्ध न केल्यास थेट मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

कोराडी वीज केंद्र स्थापत्य विभाग दोनच्या माध्यमातून सीएसआर फंड अंतर्गत एकूण १९ निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या. सर्व निविदांमध्ये जिओ-टॅगिंगची अट घालण्यात आली, परंतु स्थानिक कंत्राटदार असोसिएशनचे वकील ॲड. समीर सोनवणे यांनी पाठवलेल्या नोटीसमध्ये महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग तसेच जलसंपदा विभागाच्या १८ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या शुद्धिपत्रकाचा हवाला दिला आहे.

सदर शुद्धिपत्रकान्वये निविदा प्रक्रियेतील जिओ-टॅगिंगची अट पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. शासन निर्णय बंधनकारक असताना कोराडी वीज केंद्र स्थापत्य-२ चे मुख्य अभियंता व अधिकाऱ्यांनी रद्द झालेली अट निविदा मध्ये समाविष्ट करून थेट राज्य सरकारच्या धोरणांचे सरळ-सरळ उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे.

यासंदर्भात स्थानिक कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष सुनील पांडे व इतर पदाधिकाऱ्यांनी थेट राज्याचे ऊर्जामंत्री व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यासंदर्भात लेखी तक्रार केली आहे

जिओ-टॅगिंगच्या नावाखाली बाहेरील व नवीन इच्छुक कंत्राटदारांना प्रत्यक्ष साईट पाहणी करताना अधिकारी दाद देत नाहीत, केवळ मर्जीतील कंत्राटदारांना फायदा पोहोचवण्यासाठी व स्पर्धा रोखण्यासाठीच या अटीचा गैरवापर केला जात आहे. त्यामुळे महानिर्मिती कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप स्थानिक कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष सुनील पांडे यांनी केला आहे

स्थानिक कंत्राटदार असोसिएशनने ॲड. समीर सोनवणे यांच्यामार्फत महानिर्मिती कंपनी व मुख्य अभियंता विवेक रोकडे बजावलेल्या कायदेशीर नोटीसमध्ये १९ निविदांमधून जिओ-टॅगिंगची बेकायदेशीर अट त्वरित मागे घेण्यात यावी, चालू निविदा प्रक्रिया रद्द करून ७ दिवसांच्या आत कायदेशीर रितीने नवीन खुल्या निविदा जारी कराव्या, मानसिक त्रासाबद्दल व नोटीसच्या खर्चापोटी ५० हजार रुपये भरपाई देण्यात यावी अश्या मागण्या करण्यात आल्या आहेत.

शासनाचा स्पष्ट जीआर असताना मनमानी व भेदभावपूर्ण पद्धतीने ही अट लादली आहे हे भारतीय संविधानाच्या कलम १४ चे स्पष्ट उल्लंघन आहे असे कंत्राटदारांचे म्हणणे आहे. ७ दिवसांत न्याय न मिळाल्यास उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली जाईल असा ईशारा नोटीसमध्ये दिला आहे.




## अवैध दारुचे 'विष'

पुण्यात विषारी दारूमुळे अनेकांचा मृत्यू झाल्याने अवैध दारूवर कारवाया सुरू झाल्या. अधिकाऱ्यांचे निलंबन झाले. छापे झाले. थोडक्यात, जेव्हा विषारी दारूने एकाच वेळी अनेक माणसे मरतात, तेव्हाच फक्त दारूच्या प्रश्नाला किमान चर्चेचे आणि कारवाईचे भाग्य मिळते. अन्यथा अवैध दारूविक्री, विषारी दारू, बनावट दारूविक्री सुरूच राहते. लक्ष वेधण्यासाठी मरणाची बातमी व्हावी लागते.

अवैध दारूबद्दल 'तुम्ही दारू कोठेही विका, कशीही विका, कशातूनही बनवा, फक्त माणसे लगेच मरणार नाहीत. इतकीच काळजी घ्या,' असा एकूण सरकारी व्यवहार आहे. गंभीरपणे बोलायचे तर, एखाद्या युद्धात जितकी माणसे मरतात, त्यापेक्षाही जास्त माणसे दारू पिल्याने दरवर्षी मरतात. दवाखान्यात दीर्घ उपचार करून लिव्हर खराब झाल्याने अनेक जण मरतात. दारूमुळे होणारे आजार, भारतात रस्ते अपघातात मरणाऱ्या मद्यपींची संख्या तर प्रचंड असते, पण आमच्या संवेदना फक्त विषारी दारूबद्दल असतात.

अवैध दारू नसावी, ही भूमिका सरकारने घेतलेली आहे. परमिटच्या दुकानाबाहेर जी दारू विकली जाते, तिला अवैध दारू म्हणतात. हातभट्टीची दारू ही अवैध असते. तीही ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर आहे, पण सध्या सर्वाधिक अवैध दारू लायसन्सच्या दुकानातून आजूबाजूच्या खेड्यांमध्ये विकली जाते. लायसन्सच्या दुकानदारांनी नियमानुसार आणलेलीच ही दारू असते. तीच दारू आजूबाजूच्या १० ते २० खेड्यांमध्ये नियमित पोहोच केली. तेथील हॉटेलवाले, धाबेवाले किंवा काहीजण घरातून त्या खोक्यांची विक्री करतात. आज महाराष्ट्रात दारूचे हे सर्वांत मोठे रॅकेट आहे आणि ही दारू म्हणजेच अवैध दारू आहे.

त्यासाठी दारूबंदीचे धोरण लक्षात घेतले पाहिजे. राज्याच्या दारूबंदी धोरणानुसार दारूविक्री कमी करण्यासाठी फक्त विशिष्ट ठिकाणी लायसन्स दिले गेले. ती विक्रीही हळूहळू कमी करावी अशी सरकारी भूमिका आहे. परंतु, आज एका तालुक्यात शंभर गावे असतील व पाच गावांत लायसन्सची दारू दुकाने असतील तर ती पाच लायसन्सची दुकाने आजूबाजूच्या बहुतेक गावांमध्ये खोके पोहोच करून दारू विकतात. त्यामुळे लायसन्सच्या दारू धोरणाला काहीच अर्थ उरलेला नाही. रेशनचे धान्य पोहोचवण्यासाठी जशा गाड्या गावोगावी जात असतात त्याप्रमाणे अनेक दारू माफिया गावे वाटून घेऊन रोज रात्री दारू पोहोचवतात. पोलिस, उत्पादन शुल्क व त्या गावातील राजकीय व्यक्ती, गावातील गुंड यांच्या मदतीने हे होत असल्याने भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी त्यातून वाढली आहे. देशी दारूचा ग्राहक हा गरीब माणूस असल्याने त्याचे संसार उद्धवस्त होऊ नये म्हणून सरकारने १९७३ पासून देशी दारूचे लायसन्स देणे बंद केले. हे धोरण सर्व सरकारांनी पुढे चालवले ही नक्कीच कौतुकाची गोष्ट आहे. आता किमान देशी दारूच्या दुकानातून एकही खोके बाहेर विकले जाणार नाही, याबाबत सरकारने भूमिका घेणे अपेक्षित आहे..

अवैध दारूबाबत गावातील महिलाच फक्त आक्रमक असतात. अवैध दारू विक्रेत्याशी अन्य कोणीच वाईटपणा घ्यायला तयार नसतात. पोलिस पाटील हे पद गावच्या कायदा आणि व्यवस्थेसाठी सरकारने निर्माण केले. पोलिस पाटलांना सरकार चांगले मानधन देते, पण पोलिस पाटील दारूच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत नाहीत, असेच अनेक ठिकाणी दिसते. ज्या गावात अवैध दारू विक्री असेल त्या गावातील पोलिस पाटलांना पुन्हा नेमणूक दिली जाणार नाही, इतकी स्पष्ट भूमिका घेतली तरच गावातील अवैध दारू थांबायला मदत होईल.

अवैध दारू थांबायला दारूच्या कायद्याबाबत सुधारणा करणे गरजेचे आहे. अवैध दारू थांबवायची आहे त्यासाठी विद्यमान कायदा अजिबात पुरेसा नाही. ज्या गुन्ह्यात सात वर्षे शिक्षा नाही, त्या गुन्ह्यात अटक करू नये, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. दारूच्या गुन्ह्यात ती शिक्षा सात वर्षांपेक्षा कमी आहे. त्यामुळे पोलिस अवैध दारू पकडल्यावर विक्रेत्याला पोलिस स्टेशनला आणतात. गुन्हा दाखल होतो व त्याला सोडून दिले जाते. दुसऱ्यांदा दारू सापडली तर प्रांताधिकारी यांच्याकडे गुन्हा पाठवला जातो. फक्त बाँड घेतला जातो. पुन्हा दारू सापडली तर बाँड तोडल्याबद्दल दंड केला जातो. या शिक्षा आणि प्रक्रिया इतक्या निष्प्रभ आहेत की त्याचा कोणताच धाक गुन्हेगारांना वाटत नाही.

**– हेरंब कुलकर्णी**

# आमच्या पिढीचं गेमिंग झोन!



जनरेशन एक्स आणि वाय म्हणजेच आमची पिढी आज जेव्हा एखाद्या गेमिंग झोनमध्ये मुलांना घेऊन जाते आणि तेथे केवळ दहा मिनिटांचा खेळ खेळण्यासाठी १०० ते २०० रुपये मोजावे लागतात, तेव्हा खेळण्याची मजा विकत घ्यावी लागत असल्याची खंत मनात दाटून येते. बाजारव्यवस्थेने बालपणालाही व्यापारी स्वरूप दिल्याची जाणीव होताच आम्ही मनातल्या मनात चरफडत पैसे देतो.

लहानपणी आम्ही संध्याकाळी घरासमोरील कट्ट्यावर एकत्र जमायचो. दिवसभर धावपळ करून दमल्यानंतर अनेक मजेदार बैठे खेळ खेळायचो. आजच्या मुलांप्रमाणे आमच्या हातात मोबाईल नावाचे खेळणे नव्हते. आम्ही 'चिमणी उड, कावळा उड'पासून ते बुद्धिबळापर्यंत अनेक खेळ खेळायचो. त्यातला एक गंमतीशीर खेळ म्हणजे 'नाकाला जीभ लावून दाखवा'. हा असा खेळ होता की कोणीच जिंकू शकत नसे. जीभ लांबवता लांबवता दुखून जायची; पण ती नाकापर्यंत पोहोचत नसे. जिभेला व्यायाम देणारा हा खेळ आजच्या मुलांना माहीतही नसावा. असा खेळ कोणत्याही गेमिंग झोनवाल्याला तयार करता येणार नाही.

खेळाचे साहित्य विकत घेण्याची ऐपत नसलेल्या काळात आम्ही लहानाचे मोठे होत होतो. आंब्याच्या कोया, विटीदांडू, गाडीचे चाक अशा टाकाऊ किंवा निसर्गातून सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तूंमधून आम्ही खेळांची साधने तयार करायचो. त्या साध्या खेळांमधून मिळणारा आनंद आणि उत्साह आजच्या महागड्या गेमिंग झोनमधील मुलांपेक्षाही कितीतरी जास्त होता.

तळ्याच्या काठावर उभे राहून आम्ही पाण्यावर दगड भिरकावायचो. तो दगड पाण्यावरून टप्पे खात पुढे जाताना पाहण्यात विलक्षण मजा यायची. ज्याचा दगड सर्वाधिक टप्पे घेत असे तो विजेता ठरायचा. दोन संघांमध्ये खेळला जाणारा 'चीरघोडी' हा खेळही तितकाच लोकप्रिय होता. एका संघातील मुले एकमेकांना पकडून डोके खाली घालून घोड्याप्रमाणे उभी राहत आणि दुसऱ्या संघातील मुले धावत येऊन त्यांच्या पाठीवर उड्या मारत. सहनशक्ती, चपळता आणि ताकद वाढवणारा हा खेळ कोणत्याही गेमिंग झोनमध्ये सापडणार नाही. 'इष्टाप पार्टी' हा लपंडावाच्या प्रकारातील खेळ होता. राज्य असलेला मुलगा किंवा मुलगी इतर लपलेल्या मुलांना शोधून काढायची. मात्र लपलेल्या मुलाने पाठीमागून येऊन पाठीवर थाप मारली, तर राज्य पुन्हा त्याच मुलावर यायचे. दमछाक करणारा हा खेळ सावधपणा, सतर्कता आणि शोधक वृत्ती विकसित करणारा होता. गेमिंग झोनमध्ये असे दमछाक करणारे खेळ कुठे आहेत? स्क्रीनकडे पाहत गाडी चालवण्यात शरीराची कशी दमछाक होणार?

विहिरीत किंवा तळ्यात पोहायला जाणे हा त्या काळातील मुलांचा आवडता खेळच होता. पाण्यात मुटका टाकणे, सूर मारणे आणि विविध प्रकारचे जलक्रीडा खेळ खेळणे यामुळे हा अनुभव अधिक रोमांचक व्हायचा. 'सूरपारंब्या' खेळताना मुले झाडांवर माकडांसारखी चढत-उतरत. चपळता, धाडस आणि आत्मविश्वास वाढवणारे असे खेळ आजच्या गेमिंग झोनमध्ये आहेत का? उन्हाळ्याच्या सुट्टीत आम्ही दिवसभर क्रिकेट खेळायचो. पावसाळा सुरू झाला की विटीदांडू आणि सूरफाट्या खेळायचो. थंडीच्या दिवसांत कुस्ती, कबड्डी आणि खो-खो यांची रंगत वाढायची. ऋतूनुसार आमचे खेळ बदलायचे आणि त्यातून नवनवे अनुभव मिळायचे. गेमिंग झोनमध्ये ना अशी विविधता आहे, ना शारीरिक कष्ट, ना मैत्रीची ऊब.

खरे तर खेळ म्हणजे केवळ करमणूक नव्हे; ते व्यक्तिमत्त्व घडवण्याचे साधन असते. आमच्या खेळांनी आम्हाला मैत्री, धाडस, सहनशक्ती, चपळता, संघभावना आणि निसर्गाशी नाते जोडण्याची शिकवण दिली. आजच्या गेमिंग झोनमध्ये अत्याधुनिक साधने आहेत; पण त्या खेळांमध्ये मातीचा सुगंध नाही, मैदानी धावपळ नाही आणि बालपणाची ती निरागस उधळणही नाही.

बाजारूपणा आज सर्वच क्षेत्रांत शिरकाव करत आहे आणि खेळांचे क्षेत्रही त्याला अपवाद राहिलेले नाही. मात्र पैशाने विकत घेतलेल्या आभासी आनंदापेक्षा मैदानी खेळांमधून मिळणारा खरा आनंद, खरी मैत्री आणि खरे बालपण कितीतरी मौल्यवान असते. म्हणूनच आधुनिकतेचा स्वीकार करताना आपल्या पारंपरिक खेळांचा वारसा जपणे, पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे आणि खेळण्याचा खरा आनंद जिवंत ठेवणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

शेवटी आमच्या पिढीचं गेमिंग झोन म्हणजे घरासमोरील कट्टा, मैदाने ,तळ्याचा काठ,विहीर, झाडाखालची मोकळी जागा,शाळेचे पटांगण,शेतातील बांध,
गावातील रस्ते आणि चौक हे होतं. मोफत, सुलभ आणि सर्वांना उपलब्ध होणारं हे गेमिंग झोन आता मुलांच्या हातात मोबाईल आल्यामुळे ओस पडले आहेत. मोठमोठे शॉपिंग मॉल्स,मल्टिप्लेक्स चित्रपटगृह, अम्युझमेंट पार्क, फॅमिली एंटरटेनमेंट सेंटर्स, रिसॉर्ट्स आणि क्लब,पर्यटनस्थळांवरील मनोरंजन संकुलांमध्ये मोठ्या प्रमाणात गेमिंग झोन उभे राहत आहे. हे गेम झोन खर्चिक, कृत्रिम आनंद देणारे आणि मैत्री भाव, सामाजिकता यापासून दूर जाणार आहेत. म्हणून आमच्या पिढीच्या गेमिंग झोन कडे आजच्या मुलांना घेऊन जाणे आवश्यक आहे.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# जागतिक पर्यावरण दिन



आज ५ जून, आजचा दिवस जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. मागील दोन अडीच शतकात विशेषतः औद्योगिक क्रांती नंतर जागतिक हवामान बदल आणि इतर नुकसानकारक बदल लक्षात घेता पृथ्वीचे आयुर्मान, सहज, स्वाभाविक आणि निसर्गनियमानुसार असावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघात (युनो) ५ ते १५ जून १९७२ दरम्यान एक संमेलन झाले. यात संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यावर सखोल चर्चा केली. त्यात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे होत असलेले नुकसान आणि त्याचा मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम यावर सखोल चर्चा होऊन काहीतरी गंभीर पावले उचलली पाहिजे यावर एकमत झाले. याच संमेलनात संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम United Nations Environment Program (UNEP) चा जन्म होऊन दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले, यामुळे लोक, सरकार आणि समाजात पर्यावरण विषयक जनजागृती करता येईल. याच संमेलनात भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पर्यावरणाची बिघडती जागतिक परिस्थिती आणि त्याचा जगाच्या भविष्यावर होणारा प्रभाव या विषयावर प्रभावी भाषण दिले आणि समतोल पर्यावरणाचे महत्व विशद केले.

आंतरराष्ट्रीय पर्यावरण विषयक स्तरावर हे भारत सरकारचे पहिले महत्वाचे पाऊल होते. पुढील वर्षी म्हणजे १९७३ मध्ये धरती हा विषय घेऊन मोजक्या संकल्पनेसहित हा दिवस साजरा करण्यात आला. १९७४ मध्ये जगातील विविध शहरात हा दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करणे सुरू झाले आणि तिथून पुढे संपूर्ण जगभर दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून संपूर्ण आत्मीयतेने साजरा केला जातो. दरवर्षी सुमारे १५० देश हा दिवस साजरा करतात आणि दरवर्षी वेगळा देश हा उपक्रम जागतिक स्तरावर आयोजित करतो. जागतिक परिस्थिती, अन्न, पाणी, दुष्काळ, तापमान वाढ, हवामान बदल आणि त्याचे विपरीत परिणाम, मानवी जीवन आणि भविष्य, या सर्वांवर जनजागृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी दरवर्षी एक नवी थीम निवडून त्यासंदर्भात कार्य केले जाते. त्यासाठी मग विविध देशानी पर्यावरण संबंधित पशु, पक्षी, प्राणी आणि जंगल संवर्धन करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले. २०२० साली कोलंबियाने या दिवसाचे आयोजन केले होते.

२०२१ साली पाकिस्तान या जीवन परिवर्तन उपक्रमाचे यजमान होते. २०२२ साली स्वीडन हा देश या दिवसाचा आयोजक होता. फक्त आणि फक्त पृथ्वी ही त्या वर्षीची थीम होती. २०२३ साली आयव्हरी कोस्ट हा देश या दिवसाचा आयोजक होता. प्लास्टिक प्रदूषणावर उपाय ही त्या वर्षीची थीम होती. त्या दिवशी विविध देशांमध्ये अंतर्गत परिस्थितीत पर्यावरणविषयी होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली गेली. २०२० आणि २०२१ साली जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने हा कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरा न करता ऑनलाइन साजरा केला गेला. २०२४ साली आपली जमीन आपले भविष्य : जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळ प्रतिरोधकता या थीम खाली साजरा केला गेला. या थीमचा उद्देश जमीन पुनर्संचयित करणे वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी सक्षम राहणे हा होता. २०२४ साली सौदी अरेबिया हा जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक होता. मागील वर्षी म्हणजे २०२५ साली दक्षिण कोरिया जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक होता. प्लास्टिक प्रदूषण थांबवा ही त्या वर्षीची थीम होती. या थीमचा संदेश होता की प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी जागतिक स्तरावर एकत्र येऊन काम करणे. णछएझ नुसार पप्लास्टिक प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे, जी पर्यावरणास आणि मानवी आरोग्यास धोकादायक आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जगभर प्लास्टिक प्रदूषण आणि त्याचे दुष्परिणाम याबद्दल लोकांना जागृत करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले.

जगभरातील लोकांनी या दिवशी पर्यावरणाचे जतन करुन मानवी भविष्य सुरक्षित करण्याचा संकल्प केला आणि प्लास्टिक मुक्तीचा ध्यास घेतला. यावर्षीच्या म्हणजे २०२६ च्या जागतिक पर्यावरण दिनाची थीम आहे, हवामान बदल आणि त्यावर त्वरित कृती. या थीमचा मुख्य उद्देश वाढत्या तापमानाला रोखणे, हरित ऊर्जेचा वापर वाढवणे आणि शाश्वत भविष्यासाठी सर्वांना एकत्र आणणे हा आहे. अझरबैजान हा देश या वर्षीच्या जागतिक पर्यावरण दिनाचा यजमान देश आहे. जागतिक पर्यावरण दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## खेळी

राजपुत्रा जिंकू आणू
वरिष्ठांची नवी खेळी
ताटकळले रांगे मध्ये
निष्ठवंतांचे जाई बळी

दूर सारावे प्रतिस्पर्धी
धमकी वेळी अवेळी
मान्य करुनि घ्यायचे
रोखून बंदुकीचीनळी

आयुष्य होई वाळवंट
उठत राहते वावटळी
परिसरात काहीहोवो
मुलेआपले कवटाळी

सगे सोयरे साथ करे
सहन करत अनर्गळी
प्रवक्ते चालवे टकळी
बडबड व्यर्थ चावळी

परिवारात सत्ता फिरे
फुलत राही वंशावळी
नेतापुत्राच्या सोहळ्या
घाली मी जेवणावळी

नवस बोले जयासाठी
गर्दी भक्ताची राऊळी
उपवास करे कार्यकर्ते
चर्च मशिदी न् देवळी

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# नुसती कर्जमाफी नको शेतकऱ्यांचा कायमस्वरुपी तोडगा हवा...

## वाचक पत्र

नुकतीच महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत राज्यांतील ५५ लाख ७२ हजार शेतकऱ्यांचे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचे पीककर्ज माफ करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह म्हणावा लागेल.

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेले अल्प मुदतीचे २ लाखांपर्यंतचे पीककर्ज माफ होणारं असून ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकित आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न फेडलेली कर्जे या योजनेसाठी पात्र ठरणारं आहेत. तसेच २०२३ ते २०२६ या कालावधीत नियमीत कर्ज फेडलेल्यांना ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. ज्या शेतकऱ्यांचे २ लाखांपेक्षा अधिक कर्ज आहे.

त्यांना २ लाखांवरील थकबाकी ३१ मार्च २०२७ पूर्वी भरण्यासाठी मुदत दिली जाणारं असून ती भरल्यानंतर शासन २ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणारं आहे हे जरी खरे असले तरी शेतकऱ्यांना पुन्हा, पुन्हा कर्ज काढावे लागते त्यासाठी सरकारने शेतकऱ्यांसाठी कायमस्वरुपी तोडगा काढणे गरजेचे आहे .

सद्या खते, बि - बियांणे, शेती मशागत, मजूर, यांची सातत्याने दर वाढ, कृषि उत्पन्नाला बाजारपेठ, शेती मालाला योग्य हमी भाव मिळत नसल्याने आणि वातावरणातील बदलांमुळे शेती व्यवसाय बेभरवशाचा झाला आहे त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो आहे. हि एका महाराष्ट्राची हकिगत नाही तर संपुर्ण भारत देशांतील प्रत्येक राज्यांतील बळीराजाची व्यथा आहे. त्यामुळे भारत सरकार आणि प्रत्येक राज्ये शेतकऱ्यांसाठी कायमस्वरुपी उपाययोजना राबवून शेतकऱ्यांना उभारी देणे अपेक्षित आहे कारण शेवटी शेतकरीच सर्वांचा पोशिंदा आहे.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कर्जतमध्ये वृक्षलागवडीचा निर्धार

**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.०४, कर्जत :** जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत एक पेड... कर्जत के नाम हा उपक्रम राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

टोरेंट, कोंढाणा, पोशिर आणि शिलार प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल होण्याची शक्यता व्यक्त होत असताना, नागरिकांनी सकारात्मक आणि प्रतिकात्मक पद्धतीने पर्यावरण रक्षणासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कर्जत तालुका पर्यावरण बचाव संघर्ष समितीचे ॲड. कैलास मोरे यांनी नागरिकांना पर्यावरण रक्षणाच्या या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, विविध प्रकल्पांसाठी अंदाजे १० ते १५ लाख झाडे तोडली जाण्याची शक्यता असून, या पार्श्वभूमीवर प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी स्वीकारावी.१०-१५ लाख झाडे तोडणार तर आम्ही लाखो झाडे लावणार! या घोषणेद्वारे पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत नागरिकांनी वृक्षलागवडीच्या या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, एक जुने आणि विकसित झाड दरवर्षी सरासरी १०० ते १२० किलो ऑक्सिजन निर्माण करण्यास मदत करते, तर सुमारे २० ते २५ किलो कार्बन डायऑक्साइड शोषून घेते. त्यामुळे झाड हे केवळ निसर्गाचा भाग नसून, ते प्रदूषणा विरोधातील नैसर्गिक शस्त्र आणि जीवनाचा आधार मानले जाते.याच पार्श्वभूमीवर ५ जून रोजी प्रत्येकाने आपल्या घराजवळ, शेतात, वाडीत, गावात किंवा सार्वजनिक ठिकाणी किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

झाडे लावा.. झाड जगवा.. पर्यावरण वाचवा.. कर्जत वाचवा! हा संदेश देत पर्यावरण रक्षणासाठी एकत्र येण्याची वेळ आल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

## सराईत वाळु तस्कराची येरवडा कारागृहात रवानगी




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०४, पंढरपूर :** पंढरपूर शहर पोलीस ठाणे हदटीत अवैधपणे वाळू उपसा करून ती बेकायदेशीपणे विक्री व्यवसाय करणारा वाळु तस्कर आणि सराईत गुन्हेगार महेश तानाजी शिंदे रा. इसबावी, पंढरपुर यास एक वर्षाकरीता एम. पी.डी.ए कायदयांर्गत स्थानबध्दतेचे आदेश पारीत केलेने त्यास ताब्यात घेवुन येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबध्द करण्यात आले आहे.

सराईत आरोपी महेश शिंदे हा दहशत माजवण्या करीता वाळुचे कारणावरून जिव घेणे हल्ले करणे, लोकांना दमदाटी, मारहाण करून, गौण खनिज (वाळु) चोरी करणे असे गुन्हे केले आहेत. भारतीय न्याय संहिता २०२३ मधीत प्रकरण ६ व १७ मधील अपराधी स्वरूपाची कृत्ये असून सदरची कृत्ये करण्याची त्यास सवय जडली होती. त्याचे विरूध्द अनेकवेळा अवैधपणे वाळु व्यवसाय तसेच शरीराविषयी गुन्हे दाखल होवुन त्यामध्ये अटक करण्यात आली होती. परंतु तो सदर गुन्हयात जामीन मिळवुन अवैध वाळु व्यवसाय अव्याहतपणे सुरूच होता. तो कायदयाला जुमानत नव्हता. म्हणुन पोलीस निरीक्षक श्दशरथ वाघमोडे यांनी स्थानबध्द करणेबाबतचा प्रस्ताव मा. पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण यांचे मार्फत जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना पाठविणेत आला होता. त्याअनुशंगाने एम. पी.डी.ए कायदयांर्गत स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले होते.

सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक विजय कबाडे, सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, पोलीस निरीक्षक संजय जगताप, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापुर ग्रामीण वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी नितीन जगताप, सपोफौ कल्याण ढवणे, शरद कदम, पोलीस नाईक सचिन इंगळे स्थानिक गुन्हे शाखेचे अनिस शेख, सायबर सेलचे रतन जाधव तसेच जिल्हाधिकारी कार्यालय सोलापुर यांचेकडील विलास म्हेत्रे यांनी केली आहे.

## शैक्षणिक प्रवासातून विद्यार्थ्यांची वैचारिक जडणघडण : डॉ. सुरडकर



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** शैक्षणिक प्रवास हा केवळ पदवी किंवा गुण मिळविण्यापुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या वैचारिक जडणघडणीचा पाया आहे. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये विवेकशीलता, सामाजिक भान, नेतृत्वगुण आणि उत्तरदायित्वाची भावना विकसित होते. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या दृष्टीने शिक्षण न घेता समाजासाठी उपयुक्त वागरिक बनण्याचे ध्येय ठेवले पाहिजे, असे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. संतोष सुरडकर यांनी केले.

ते धनोजे कुणबी समाज मंदिर लक्ष्मीनगर, वडगाव तर्फे आयोजित गुणवंत सत्कार सोहळा व करिअर मार्गदर्शन- २९२६ च्या कार्यक्रमात मुख्य वक्ता म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धनोजे कुणबी समाज मंदिराचे अध्यक्ष श्रीधर मालेकर होते. उद्घाटक खासदार प्रतिभा धानोरकर, मुख्य अतिथी आ. देवराव भोंगळे, सीमा अडबाले उपस्थित होते. अतिथी गडचांदूरचे नगराध्यक्ष निलेश ताजने, स्वागताध्यक्ष विजय टोंगे, सुलोचना बल्की, बल्लारपूरच्या नगराध्यक्षा अल्का वाढई, समाज मंदिराचे उपाध्यक्ष संजय ढवस, सचिव अतुल देऊळकर, प्रा. नामदेव मोरे, कोषाध्यक्ष सुधाकर काकडे, सल्लागार मनोहर पाऊनकर, सदस्या मनिषा बोबडे, रवी झाडे, संजय वैद्य, ॲड. देवा पाचभाई उपस्थित होते.

खा. प्रतिभा धानोरकर यांनी ' समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शीक्षण, संघटन आणि सामाजिक एकता अत्यंत महत्वाची आहे. महिलांना स्वातंत्र्य हवे आहे. धनोजे कुणबी समाज मंदिराच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करुन त्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देण्याचे कार्य स्तुत्य आहे. आजचे गुणवंत विद्यार्थी हे उद्याचे सक्षम नेतृत्व असून त्यांच्या यशातून समाजाची प्रगती निश्चित होणार आहे. समाजाच्या मुलींच्या वसतिगृहासाठी तसेच शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उन्तीसाठी माझे नेहमीच सहकार्य राहील, असे खासदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या. यावेळी आ. देवराव भोंगळे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्ह्यातील धनोजे कुणबी समाजातील विविध नगराध्यक्ष व नगरसेवकांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विजय टोंगे यांनी केले. संचालन प्रा. नामदेव मोरे व मनीषा ताजने यांनी केले. तर आभार प्रदर्शन सुधाकर काकडे यांनी मानले. कार्यक्रमाला समाजबांधव, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# अहिल्यानगरमध्ये १२५ टँकरने पाणीपुरवठा

## १३९ गावे, ७३८ वाड्यावस्त्यांना १२५ टँकरद्वारे पाणीपुरवठा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, अहिल्यानगर :** जिल्ह्यात वाढल्या उन्हामुळे जलस्रोत कोरडे पडल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे, पाणीटंचाईचे सावट अधिकच वाढू लागले आहे. गेल्या आठवडाभरात ३२ टँकरची वाढ झाली. सध्या जिल्ह्यात १२५ टँकरमार्फत १३९ गावे, ७३८ वाड्यावस्त्यांवरील २ लाख ३५ हजार ७२८ लोकसंख्येची तहान भागवली जात आहे. विशेषतः जिल्ह्याच्या दक्षिण भागात टँकरची मागणी वाढलेली आहे. टँकर मंजूर झाले तरी त्याच्या प्रत्यक्षात खेपा कमी होत असल्यामुळे नागरिकांना आवश्यकतेपेक्षा कमी पाणी उपलब्ध होत आहे.

पाणीपुरवठ्यासाठी दिवसभरात १२५ टँकरच्या एकूण २९४ खेपा मंजूर करण्यात आल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात २६१ खेपा होत आहेत. ज्या तालुक्यात टंचाईची तीव्रता अधिक आहे तेथेच म्हणजे कर्जत, जामखेड, पाथर्डी तालुक्यात टँकरच्या खेपा निम्म्याने कमी होत आहेत. उद्भावाचे पाणी कमी होणे, वीजपुरवठा खंडित होणे, टँकर नादुरुस्त होणे अशा विविध कारणांनी टँकर गावांपर्यंत पोहोचत नाहीत.

दक्षिण भागात टँकरची संख्या वाढलेली असली तरी जिल्ह्यात अद्याप कोपरगाव, राहुरी, श्रीरामपूर, राहता व श्रीगोंदा या ५ तालुक्यातून अद्याप एकही टँकर सुरू झालेला नाही. उत्तरेतील अकोला व दक्षिणेतील राहुरी वगळता इतर सर्व तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू करण्यात आले आहेत. वाढत्या उन्हामुळे भूजल पातळी विलक्षण खालावू लागली आहे.

**टँकरची संख्या पुढीलप्रमाणे :-**

संगमनेर २८ गावे ७१ वाड्यावस्त्यामधील ३९ हजार २२६ लोकसंख्येला २१ टँकर, अकोल्यातील पाच गावे २१ वाड्यावस्त्यांच्या ७ हजार १०७ लोकसंख्येला ४ टँकर, नेवासा तालुक्यातील १ गाव १७ वाड्यावस्त्यावरील २ हजार ३७६ लोकसंख्येला १ टँकर, अहिल्यानगर १५ गावे ६३ वाड्यांमधील २ हजार ३५३ लोकसंख्येसाठी १५ टँकर, पारनेर तालुक्यातील ३८ गावे,

३०३ वाड्यावस्त्यांवरील ७१ हजार ६५५ लोकांना ३५ टँकर, पाथर्डीतील १६ गावे,७६ गाड्यांमधील ४९ हजार ९५१ लोकांना २४ टँकर, शेवगावमधील १० गावे ५२ वाड्यातील १४ हजार ९७ लोकांना ७ टँकर, कर्जत- जामखमधील १३ गावे, १०१ वाड्यांना १२ टँकरमार्फत २४ हजार २०३ लोकसंख्येला, जामखेड ३ गावे,३ वाड्यामधील ७ हजार ५६० लोकसंख्येला ३ टँकरमार्फत, पारनेर नगरपंचायत हद्दीतील ३१ वाड्यावस्त्यांवरील ५ हजार लोकांना ४ टँकर सुरू करण्यात आले आहेत.

# ५२ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा




**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०४, सोलापूर :** स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरी, नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरू असलेल्या ५२व्या कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत बुधवारी रंगलेल्या साखळी फेरीतील सामन्यांनी स्पर्धेची उत्कंठा अधिकच वाढवली.

मुलींच्या गटात नंदुरबार आणि धुळे यांनी चुरशीच्या लढतीत निसटते विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, तर कुमार गटात मध्यंतराला पिछाडीवर असलेल्या लातूरने जालनावर शानदार पुनरागमन करत विजय मिळवला. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

**कृतिमा नाईकच्या अष्टपैलू खेळीने नंदुरबारची विजयी घोडदौड**

मुलींच्या गटातील अत्यंत रंगतदार सामन्यात नंदुरबारने जळगाववर ३६-३१ अशी मात करत उपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित केले. मध्यंतराला १९-१७ अशी मिळालेली आघाडी अखेर निर्णायक ठरली. नंदुरबारच्या कृतिमा नाईक (२ मि. संरक्षण व ६ गुण) हिने अष्टपैलू खेळ करत विजयाचा पाया रचला. तिला सोनल वसावे (६ गुण) आणि प्रतीक्षा गावित (६ गुण) यांनी आक्रमणात मोलाची साथ दिली. जळगावकडून गौरी जाधव (८ गुण) हिने झुंजार खेळी केली, मात्र तिचे प्रयत्न संघाला विजय मिळवून देण्यासाठी अपुरे पडले.

**धुळ्याने रायगडची मुसंडी रोखली; नंदिनी सिसोदियाची कमाल**

दुसऱ्या चुरशीच्या सामन्यात धुळ्याने रायगडचा ३१-२८ असा निसटता पराभव करत पुढील फेरी गाठली. मध्यंतराला १२-२२ अशी पिछाडी असूनही रायगडने जोरदार पुनरागमनाचा प्रयत्न केला. साक्षी शेट्टी (२ मि. संरक्षण व ६ गुण) आणि अनया अरसुल (२.३० मि. संरक्षण व ६ गुण) यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. मात्र धुळ्याच्या नंदिनी सिसोदिया (१.२० मि. संरक्षण व १० गुण) हिने एकहाती आक्रमण करत सामना फिरवला, तर हर्षदा कोळी (२.५० मि. संरक्षण व २ गुण) हिने भक्कम साथ दिली आणि धुळ्याचा विजय निश्चित केला.

**लातूरची दमदार कमबॅक; जालनाचा पराभव**

कुमार गटातील दिवसातील सर्वाधिक लक्षवेधी सामन्यात लातूरने मध्यंतराच्या १३-१६ अशा पिछाडीवरून पुनरागमन करत जालनाचा ३४-३१ असा ३ गुणांनी पराभव केला. लातूरच्या विजयात आदित्य जाधव (२ मि. संरक्षण व ६ गुण) आणि श्रीशैल बिराजदार (१.३० व ३.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी निर्णायक भूमिका बजावली. जालन्याकडून आयन पठाण (३.२० मि. संरक्षण व ४ गुण) याने चिवट झुंज दिली; मात्र त्याला सहकाऱ्यांची अपेक्षित साथ मिळाली नाही.

**प्रतीक नगारेच्या अष्टपैलू खेळीने धुळ्याची परभणीवर सरशी**

कुमार गटातील आणखी एका चुरशीच्या सामन्यात धुळ्याने परभणीवर ४०-३४ असा ६ गुणांनी विजय मिळवला. धुळ्याकडून प्रतीक नगारे (२.३० व १ मि. संरक्षण व ८ गुण) याने अष्टपैलू कामगिरी करत संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. परभणीकडून शिवराज चिंचलवाड (१.२० मि.संरक्षण) याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली; मात्र धुळ्याची सरस कामगिरी त्यांच्यासाठी अडथळा ठरली.

**एकतर्फी सामन्यांत प्रतिस्पर्ध्यांचा धुव्वा**


दिवसभरातील बहुतांश अन्य सामने पूर्णपणे एकतर्फी झाले. अनेक संघांनी प्रतिस्पर्ध्यांचा अक्षरशः धुव्वा उडवत किंवा दणदणीत पराभव करत पुढील फेरीतील आपली दावेदारी भक्कम केली. स्पर्धेची पातळी आणि संघांमधील स्पर्धात्मकता पाहता पुढील बाद फेरीतील सामने अधिक रंगतदार होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केलेले संघ**

**कुमार गट :-** धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, धुळे, सांगली, लातूर, पुणे, पालघर, सातारा, रत्नागिरी, मुंबई उपनगर, नाशिक, ठाणे, बीड, अहिल्यानगर आणि मुंबई.

**मुली गट :-** सांगली, नंदुरबार, ठाणे, परभणी, धाराशिव, मुंबई उपनगर, सोलापूर, पालघर, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, जालना, सातारा, मुंबई, रत्नागिरी आणि धुळे.

# पालखी तळावरील अतिक्रमणे तात्काळ काढावीत - विभागीय आयुक्त



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०४, पंढरपूर :** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२५ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पाणी, आरोग्य, सुरक्षा, स्वच्छतेच्या पुरेशा सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशा सूचना विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पांगारकर, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी, कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा नगर विकास प्रशासन अधिकारी योगेश डोके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी विभागीय आयुक्त शितल तेली-उगले म्हणाल्या, पालखी मार्गावरुन पालखी तळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी.

पालखी तळावर आवश्यक ठिकाणी मुरूमीकरण, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा, वीज, आरोग्य सुविधा देण्यात याव्यात. नातेपुते येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाच्या वाढीव जागेबाबत तात्काळ कार्यवाही करावी.

पालखीतळावर अतिक्रमणे काढून घ्यावीत. पालखी तळांवर हायमास्ट दिव्यांची संख्या वाढवावी. श्री संत सोपान काका पालखी सोहळ्यासाठी नव्याने उपलब्ध करून देण्यात आलेला भंडीशेगांव येथील पालखी तळावरील जलसंपदा विभागाच्या जुन्या इमारतीबाबत आवश्यक ती कार्यवाही करून ३० जून पर्यंत जुन्या इमारती पाडून त्या ठिकाणी सपाटीकरण व मुरमीकरण करून पालखी तळ स्वच्छ व सुयोग्य करावा, सर्व आवश्यक ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करावी, अशा सूचना ही विभागीय आयुक्त शीतली उगले यांनी दिल्या.तसेच पालखी तळांवर कायमस्वरुपी सुविधा देण्याबाबत पालखीसोहळा प्रमुखांशी चर्चा करुन नियोजन करावे.

वारी कालावधीत वैद्यकीय सुविधा बरोबर तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करावी. ६५ एकर येथे प्रशासनाकडून दिंड्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात येते. दिवसेंदिवस दिंड्यांची संख्या वाढत असल्याने जागा अपुरी पडत असेल तर पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, अशा सूचना ही त्यांनी यावेळी दिल्या.यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले, पालखी मार्ग व तळांवर सुविधा बाबत पालखी सोहळा प्रमुखांनी सुचविलेल्या कामांना प्राधान्य देवून ती कामे पुर्ण करण्यात येत आहेत. पालखी सोहळे जिल्ह्यात प्रवेश केल्यानंतर सर्व भाविकांना, पालखी मार्ग व तळांवर आवश्यक सुविधा प्रशासनकडून उपलब्ध केल्या जातील असे त्यांनी सांगितले. तसेच जिल्हा प्रशासनाकडून पालखी मार्गावर व तळांवर प्रशासकडून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी पालखी मार्ग व तळांवर जिल्हापरिषदेमार्फत आरोग्य, पिण्याचे पाणी, स्नानगृह, हिरकणी कक्ष, विश्रांती कक्ष महिला भाविकांसाठी देण्यात येणाऱ्या सुविधेबाबत माहिती दिली. पालखी सोहळ्या बरोबर दिवसेंदिवस दिंड्यांची तसेच वारकरी भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे व उपलब्ध असणारे पालखीतळ सद्यस्थितीत कमी पडत असल्याने पालखी तळास वाढीव जागा मिळावी, तसेच जर्मन हँगरची संख्या वाढवावी अशी मागणी संत ज्ञानेश्वर पालखी सोहळा विश्वस्त योगी निरंजन दास, पालखी सोहळा प्रमुख ॲड.राजेंद्र उमाप यांनी यावेळी केली.

यावेळी विभागीय आयुक्त शितल तेली उगले यांनी नातेपुते, माळशिरस, वेळापूर, भंडीशेगाव, वाखरी येथील पालखीतळांची पाहणी केली. तसेच मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या व करण्यात आलेल्या कामांची पाहणी करून माहिती घेतली. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी आराखड्या अंतर्गत करण्यात आलेल्या कामांची माहिती दिली.

# मुख्यमंत्र्यांच्या कर्जमाफी आदेशाची देसवडेमध्ये होळी

## भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने आंदोलन; शेतकऱ्यांना गंडवले, कर्जमाफी फसवी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन आदेशामध्ये अत्यंत जाचक अटी शर्ती लागू करण्यात आल्या असून त्या तातडीने रद्द झाल्या पाहिजे. यावेळची कर्जमाफी आजपर्यंतच्या सर्व कर्जमाफीमध्ये सर्वात कडक अटी शर्ती असलेली व खूप कमी शेतकऱ्यांना लाभ देणारी ठरणार आहे. त्यासाठी सरकारने सरसकट कर्जमाफी केली पाहिजे अशा मागण्या करत कर्जमाफीसाठी सरकारने काढलेल्या शासन निर्णयाच्या विरोधात भूमिपूत्र शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे.



पारनेर तालुक्यातील देसवडे येथे भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकऱ्यांनी एकत्र येत कर्जमाफी आदेशाची होळी करत आंदोलन केले. यावेळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

राज्य शासनाने जाहीर केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी असून त्यामध्ये किचकट अटी व नियमांचा समावेश करण्यात आल्याचा आरोप आंदोलकांनी केला. शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून तो राज्यभर आंदोलनाच्या माध्यमातून व्यक्त होत असल्याचा दावा यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी केला आहे. त्यामुळे आता फडणवीस सरकारच्या विरोधात शेतकरी संघटना आक्रमक होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

कर्जमाफीसाठी लावण्यात आलेल्या अटी रद्द करा तसेच सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, अशी किसान सभेची मागणी आहे. सरकारने कर्जमाफी करताना, २०१९ मध्ये कर्जमाफी घेतलेले शेतकरी, जरी ते यावेळी थकित असले तरी त्यांना केवळ ५० हजार रुपयांच्या मर्यादित कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्जदारांना सुद्धा केवळ ५० हजार रुपये देण्यात येणार आहे. त्यांनाही किमान दोन वर्ष नियमित कर्जदार असणे ही अट टाकण्यात आली आहे.

अत्यल्प पगारावर राबणाऱ्या सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीतून वगळण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन द्यायचे आणि आता २ लाख कर्ज माफ करणार सांगून बहुसंख्य शेतकऱ्यांची केवळ ५० हजारावर बोळवणूक करायची ही अत्यंत संतापजनक गोष्ट असून ही शेतकऱ्यांची घोर फसवणूक असल्याची टीका भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर यांनी यावेळी बोलताना केली.

कर्जमाफीसाठी लावलेल्या अटी रद्द करा. सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या. नियमित कर्जदार शेतकरी, शेड नेट, पॉली हाऊस शेतकरी, कुक्कुट पालन शेतकरी यांच्यासह सर्व पीक व शेती सुधारणा कर्ज माफ करा आदी मागण्या करण्यात आल्या.

या आंदोलनावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर, सरपंच पोपट दरेकर, चेअरमन संतोष टेकुडे, विशाल वाडेकर, ठमाजी भोर, रावसाहेब फटांगरे, काशिनाथ गोळे, मंजाबापू वाडेकर, पंडित गागरे, साहेबराव भोर, शंकर भोर, अजित वाडेकर, राहुल पारधी, देविदास टेकुडे, किरण फटांगरे, तेजस फटांगरे, हर्षद वाडेकर, गणेश फटांगरे, बाळासाहेब वाडेकर, पप्पू वाडेकर, भाऊसाहेब दरेकर, एकनाथ फटांगरे, नवनाथ जाधव, सुरेश दरेकर, सचिन खाडे, साहेबराव वाडेकर, उपसरपंच सचिन भोर, शांताराम भोर, बाबासाहेब वाडेकर, पोपट फटांगरे, शंकर टेकुडे, दत्ता फटांगरे, बबन भोर, सचिन घेमूड यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाफेडमार्फत राज्यभर समान दराने कांदा खरेदी करा – सभापती बेलकर

## बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** सध्या कांद्याचे कोसळलेले बाजारभाव आणि वाढलेला उत्पादन खर्च यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांचा हा कांदा नाफेडच्या माध्यमातून राज्यभर एकाच समान दराने खरेदी करण्यात यावा, अशी आक्रमक मागणी पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन नुकतेच नायब तहसीलदार दीपक करखिले यांना देण्यात आले.

केंद्र शासनाने नाशिक जिल्ह्यात नाफेडमार्फत १५.८० रुपये प्रति किलो दराने कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचे स्वागत होत असले तरी, हा निर्णय केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित ठेवणे हे अहिल्यानगरसह राज्यातील इतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर अन्यायकारक असल्याचे सभापती बेलकर यांनी निवेदनात नमूद केले आहे. राज्यातील सर्वच जिल्ह्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती सारखीच असून, सर्वांना समान न्याय मिळायला हवा, अशी भूमिका बाजार समितीने घेतली आहे. गेल्या काही दिवसांत खते, बियाणे, औषधे, मजुरी आणि बारदाण्याचे दर गगनाला भिडले आहेत. वाढलेल्या उत्पादन खर्चामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, हाती काहीच शिल्लक राहत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्व जिल्ह्यांत नाफेड मार्फत २० रुपये प्रति किलोपेक्षा जास्त दराने कांदा खरेदी सुरू करावी, जेणेकरून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.



केंद्र सरकारने नाशिक प्रमाणेच राज्यातील सर्व कांदा उत्पादक शेतकऱ्यांना नाफेड मार्फत समान न्याय द्यावा. केवळ एका जिल्ह्यापुरता खरेदीचा निर्णय घेणे अन्यायकारक आहे. वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी पूर्णपणे कर्जबाजारी झाला असून, त्याला दिसला देण्यासाठी सरकारने तातडीने २० रुपयांच्या वर दर देऊन कांदा खरेदी सुरू करावी. शेतकऱ्यांच्या हितासाठी आम्ही शासनदरबारी हा लढा कायम ठेवणार आहोत.

**- गंगाराम बेलकर (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, पारनेर)**

# निफाड तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीला वेग

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०४, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील मुदत संपलेल्या, डिसेंबर २०२६ पर्यंत मुदत संपणाऱ्या तसेच सध्या प्रशासक राजवट असलेल्या ९६ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया आता खऱ्या अर्थाने गतिमान झाली आहे.

या सर्व ग्रामपंचायतींसाठी वार्डनिहाय (प्रभागनिहाय) आरक्षण सोडतीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून, यासंदर्भात निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी रीतसर आदेश जारी केले आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, येत्या १० ते १२ जून दरम्यान संबंधित गावांमध्ये विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या ग्रामसभांमध्ये अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), नागरिकांचा मागास प्रवर्ग (OBC) तसेच महिलांसाठीच्या आरक्षणाची सोडत (लॉटरी) काढली जाईल.

विशेष म्हणजे, या आरक्षित जागा ठरवण्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या विशेष ग्रामसभांसाठी 'कोरम'ची (किमान उपस्थितीची) आवश्यकता असणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या आरक्षण सोडतीमुळे ग्रामीण भागातील राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे.

### इच्छुकांची धाकधूक वाढली; मोर्चेबांधणीला सुरुवात

गेल्या अनेक महिन्यांपासून तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्त असल्याने गावगाड्याचा कारभार काहीसा संथ गतीने सुरू होता. आता थेट आरक्षणाची तारीख निश्चित झाल्यामुळे आपला हक्काचा प्रभाग किंवा वार्ड कोणत्या प्रवर्गासाठी आरक्षित होणार, याकडे विद्यमान सदस्य, माजी पदाधिकारी आणि नवख्या इच्छुकांचे डोळे लागले आहेत.

आपला पत्ता कट होणार की संधी मिळणार, या चिंतेने इच्छुकांची धाकधूक वाढली आहे. आरक्षण जाहीर होताच गावागावांत पॅनेल निर्मिती, गुप्त बैठका आणि उमेदवारीच्या चाचपणीला मोठी गती येणार असल्याचे चित्र आहे.

### निवडणुकीचा संपूर्ण अधिकृत कार्यक्रम :

- ८ जून : विशेष ग्रामसभेची नोटीस प्रसिद्ध करणे.
- १० ते १२ जून : विशेष ग्राम सभेत प्रत्यक्ष प्रभागनिहाय आरक्षण सोडत काढणे.
- १७ जून : आरक्षण प्रारूप अधिसूचनेस जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेणे.
- १९ जून : प्रारूप आरक्षण जाहीर प्रसिद्ध करणे.
- १९ ते २५ जून : आरक्षणावर हरकती व सूचना दाखल करण्याची मुदत.
- ३ जुलै पर्यंत : प्राप्त हरकतींवर प्रशासनाचा अभिप्राय देणे.
- ८ जुलै : अंतिम अधिसूचनेस मंजुरी देणे.
- १० जुलै : अंतिम प्रभागरचना व आरक्षण अधिसूचना प्रसिद्ध करणे.

### 'या' ९६ ग्रामपंचायतींचा समावेश:

तालुक्यातील मरळगोई खुर्द, मरळगोई बु./गोळेगाव, पाचोरे खुर्द, पाचोरे बु./शिवापूर, तळवाडे, थेरगाव, विष्णूनगर, कानळद, नारायण टेंभी, गोरठाण, कुरुडगाव, देवपूर, दिंडोरी तास, कुंदेवाडी, सारोळे खुर्द, शिंपीटाकळी, तामसवाडी, वेळापूर, कुंभारी, पंचकेश्वर, सारोळे थडी, धारणगाव खडक, हनुमाननगर, जिव्हाळे, लालपाडी/चेहडी खुर्द, शिवरे, वर्हेदारणा, श्रीराम नगर, डोंगरगाव, पाचोरेवणी, मौजे सुकेणे, चितेगाव, रौळस, आहेरगाव, चाटोरी, देवगाव/महादेवनगर, खेडे, कोठुरे, लासलगाव, म्हाळसाकोरे, नैताळे/रामपूर, रानवड, टाकळी विंचूर, पिंपळगाव नजीक, गाजरवाडी, खेडलेझुंगे, मुखेड, नारायणगाव, रुई/धानोरे, सावरगाव, सोनगाव, वाहेगाव/दहेगाव, वावी, विंचूर/विठ्ठलवाडी, वाकद, उंबरखेड, वडाळीनजीक, करंजगाव, नांदूरखुर्द, नांदूरमध्यमेश्वर, पिंपळगाव निपाणी/सावळी, सायखेडा, उगाव, भेंडाळी, बेहेड, भुसे, गोंदेगाव, एकलहरे, नांदगाव, दारणासांगवी, कोळगाव, रसलपूर, शिरसगाव, शिरवाडे वाकद, शिरवाडेवणी, सोनेवाडी बु., सुंदरपूर, वनसगाव, ब्राह्मणगाव विंचूर, भरवस/मनोरी खुर्द, ब्राह्मणगाव वनस, दात्याने, दावचवाडी, कारसूळ, महाजनपूर, पिंपरी, रामनगर (बेरवाडी), शिवडी, REDGAON बु., आंतरवेली, चापडगाव, करंजी खुर्द/ब्राह्मणवाडे, सुभाषनगर आणि औरंगपूर/श्रीरामपूर या ग्रामपंचायतींचा यात समावेश आहे.

### अधिकारी वर्गाची नियुक्ती

ही अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाची आरक्षण प्रक्रिया पूर्ण पारदर्शकतेने पार पाडण्यासाठी तहसील प्रशासनाने विविध विभागातील अधिकाऱ्यांची 'अध्यक्ष अधिकारी' म्हणून नियुक्ती केली आहे.

यामध्ये मंडळ अधिकारी शशिकांत विधाते, जयंत लिलके, आश्विनी भोसले, डी. बी. केसरे, सतीश बोडके, गोविंद काळे, रुपाली सावळे, संतोष डुंबरे, प्रमोद रणदिवे यांच्यासह विस्तार अधिकारी गौरव हिरे, विनोद साबळे, राजेश थोरात, प्रशांत बोरस्ते तसेच कृषी विभागाचे जनार्दन क्षिरसागर, राहुल धनगर आणि मनोज रोंगटे यांचा समावेश असून ही टीम निवडणुकीची पूर्वतयारी हाताळणार आहे.

# थोडक्यात

## ग्रामीण भागातील मुलींचे यश प्रेरणादायी – आ.दाते

## मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल कन्यांचा गौरव



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०४, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील काजल मच्छिंद्र खामकर व सुप्रिया अशोक आंधळे यांची मुंबई पोलीस खात्यात कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाल्याबद्दल पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

या सत्कार समारंभास जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंतराव चेडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, आर.एस. कापसे, देवराम शेठ मगर, सुभाषराव सासवडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका महिला अध्यक्षा सुषमाताई रावडे, भाऊसाहेब खामकर, दत्तात्रय सरोदे, प्रदीप रोकडे, माजी सरपंच बाबासाहेब शिंदे, कैलास खामकर, मंगेश खामकर, तुषार खामकर, विठ्ठल खामकर, शैलेश जांभळकर, शुभम आंधळे, विठ्ठल बर्डे, अमोल शिंदे, आप्पा गायकवाड, जयवंत खामकर, विश्वनाथ गोरडे, शुभम चौधरी, दिपक खामकर, मच्छिंद्र खामकर, इरफान शेख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व तालुक्यातील विविध गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कारानंतर उपस्थित मान्यवरांनी दोन्ही युवतींचे अभिनंदन करत त्यांच्या भावी सेवेसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. ग्रामीण भागातील मुलींनी कठोर परिश्रम, चिकाटी आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा यांच्या बळावर मिळविलेले हे यश निश्चितच नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

ग्रामीण भागातील मुली जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. काजल खामकर आणि सुप्रिया आंधळे यांची मुंबई पोलीस दलात झालेली निवड ही केवळ त्यांच्या कुटुंबासाठी नव्हे तर संपूर्ण पारनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील इतर विद्यार्थिनींनाही मोठी प्रेरणा मिळणार असून त्यांनी प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत समाजसेवेचा आदर्श निर्माण करावा, असे आमदार काशिनाथ दाते म्हणाले.

## डीएपी व युरिया खतांचा मुबलक साठा उपलब्ध करून देण्याची शेतकऱ्यांची मागणी



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.०४, बोरी (परभणी) :** खरीप हंगामाला सुरुवात झाली असून तालुक्यातील शेतकरी सध्या पेरणीच्या कामात व्यस्त आहेत. शेतकऱ्यांनी तूर, मूग, उडीद, सोयाबीन, कापूस आदी पिकांच्या पेरणीला वेग दिला आहे. अशा परिस्थितीत डीएपी व युरिया खतांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाली असून बाजारपेठेत या खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्याची मागणी भाजप किसान मोर्चा च्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, सध्या खरीप पिकांच्या पेरणीचा हंगाम सुरू असल्यामुळे शेतकऱ्यांना डीएपी व युरिया खताची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता भासत आहे. मात्र अनेक ठिकाणी खतांचा पुरेसा साठा उपलब्ध नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी तसेच पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असलेली खते वेळेत मिळावीत यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत.

जिंतूर तालुक्यात शेती हा प्रमुख व्यवसाय असून हजारो शेतकरी खरीप हंगामावर अवलंबून आहेत. खतांचा तुटवडा निर्माण झाल्यास पेरणी व पीक व्यवस्थापनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कृषी विभागाने खत विक्रेत्यांमार्फत डीएपी व युरिया खताचा पुरेसा साठा उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी भाजप किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष दिनकर चौधरी, गंगाधर देशमुख, अशोक शिंपले, वामनराव शिंपले, पंडितराव घोलप, मुंजाभाऊ कंठाळे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

## वडसी येथे टॉवर असुनही मोबाईल मध्ये नेटवर्क नाही

## परिसरातील जिओ सिम धारक त्रस्त

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०४, चिमूर (चंद्रपूर) :** तालुक्यातील वडसी परीसरात गेल्या अनेक दिवसांपासून जिओ कंपनीच्या सिमकार्ड धारकांना नेटवर्क मिळत नसल्याने मोबाईल धारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.विशेष म्हणजे गावात टॉवर असुनही नेटवर्क मिळत नसल्याने मोबाईल धारक हैराण झाले आहेत.

आधी ग्राहक आयडिया, ओडाफोनचे सिमकार्ड वापरत होते नेटवर्क मिळत नसल्याने जिओ मध्ये पोर्ट केले होते. मात्र आता जिओ सिम वापरताना देखील याच अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने मोठी नामुष्की मोबाईल धारकांवर आली आहे. अन्न, वस्त्र, निवारा, याचप्रमाणे आता मोबाईल हा मूलभूत गरजेपैकी एक झाला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

नेटवर्कमुळे नागरिक, व्यापारी, ऑनलाइन काम करणारे, इंटरनेट बँकिंग वापरणारे, ऑनलाइन क्लासेस करणारे शाळकरी विद्यार्थी मेटाकुटीला आले आहेत. त्यामुळे जियो मोबाईल कंपनीचे नेटवर्क मधील तांत्रिक बिघाड दुरुस्त करून चांगल्या प्रकारची सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.

कंपनीकडून ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सुविधा कडे लक्ष देत नसल्याचे चित्र दिसुन येत आहे.त्यामुळे मोबाईल टॉवर शोभेची वस्तू बनले आहे.ग्राहकानी हजारो रुपयांचे मोबाईल घेऊन सुध्दा नेटवर्क नसल्याने खिलोने झाले आहेत.नेटवर्क नसल्याने मोबाईलवर बोलने सुध्दा होत नाही.कधी इंटरनेट काम करत नाही कधी पुर्ण रेंज जाते अशी जिओची परिस्थिती निर्माण झाली आहे.तरी त्वरित तांत्रिक बाबी तपासून पुर्वी प्रमाणे सेवा द्यावी अशी मागणी वडसी, गोंदेडा, खातोडा, केवाडा, पेट येथील मोबाईल ग्राहकांनी केली आहे.